# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१७.०९.२०२१**

## जिल्हा : सातारा

| मागील आठवड्यातील हवामान (११.०९.२०२१ ते १७.०९.२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज १८.०९.२०२१ ते २२.०९.२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | दिनांक | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| ७.३ | ४.० | १२.३ | १०.१ | २.८ | १.० | - | पाऊस (मिमी) | ३.० | ३.० | ७.० | ५.० | ५.० |
| २७.० | २७.७ | २७.९ | २६.८ | २८.१ | २८.३ | - | कमाल तापमान (अं.से.) | ३०.० | ३१.० | ३१.० | ३०.० | ३०.० |
| २१.५ | २१.९ | २१.७ | २१.८ | २२.० | २०.९ | - | किमान तापमान (अं.से.) | २२.० | २२.० | २१.० | २१.० | २१.० |
| ६ | ८ | ७ | ७ | ७ | ७ | - | ढग स्थिती (आकाश) | ६ | ६ | ८ | ७ | ८ |
| ८९ | ९१ | ८४ | ९५ | ८२ | ८५ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९४ | ९४ | ९१ | ९३ | ८९ |
| ८५ | ९० | ८३ | ९५ | ७७ | ७५ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६२ | ६० | ६१ | ६६ | ६७ |
| ३.७ | ३.७ | ३.७ | ०.० | ५.६ | ०.० | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७.० | ७.० | ७.० | ८.० | ११.० |
| आ. | आ. | आ. | उ. | आ. | उ. | - | वाऱ्याची दिशा | प.नै. | प.नै. | प. | प.नै. | प.नै. |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक १८ ते २२ सप्टेंबर दरम्यान आकाश ढगाळ राहण्याची व दिनांक १८ ते २२ सप्टेंबर दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान ३०.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २१.० ते २२.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८९ ते ९४% तर दुपारची सापेक्ष आद्रता ६० ते ६७% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०७ ते ११ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित पल्ल्याच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २२ ते २८ सप्टेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून अँड्रॉइड ॲप्लिकेशन "मेघदूत " तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इअँड्रॉइड "दामिनी" च्या अंदाजासाठी. ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>➢ पावसाची उघडीप पाहून व वारा शांत असतानाच पिकांवर किटकनाशक व बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>➢ पक्व झालेल्या खरीप पिकांची काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल पावसाची शक्यता असल्याने सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| संदेश | | सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक १८ ते २२ सप्टेंबर दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेला शेतीमाल सुरक्षित ठेवावा. |
| भात | फुटवे ते पोटरी अवस्था | ➢ भात खाचरामध्ये पाण्याची पातळी अधिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत ३ ते ५ से.मी. ठेवावी तसेच भात पोटरीच्या अवस्थेत असताना ५ ते १० से.मी. ठेवावी.<br>➢ भात पिकावर निळे भुंगेरे आणि पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी क़्युनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २ लिटर किंवा ट्रायझोफोस ४० टक्के प्रवाही ६२५ मी.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही २५० मी. ली.यापैकी एक कीटकनाशक ५०० लिटर पाण्यात मिसळून १ हेक्टर क्षेत्रावर फवारावे.<br>➢ भात पिकावर तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी पिकावर इमिडाक्लोप्रीड २०एस.एल. (१२५ मिली) किंवा थायोमिथोक्झाम २५ डब्ल्यू. जी.(१०० ग्रम) प्रती हेक्टरी या प्रमाणात वापरावे. |
| रब्बी ज्वारी | पेरणी | ➢ रब्बी हंगामातील ज्वारीची पेरणी पावसाची उघडीप पाहून १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या कालावधीत पावसाच्या ओलीवर ५ सें.मी. खोलीपर्यंत करावी.<br>➢ बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ४ ग्रॅम गंधक (३०० मेश पोताचे) चोळावे तसेच २५ ग्रॅम अॅझोटोबक्टर व पी.एस.बी. कल्चर चोळावेत. पेरणी अंतर: ४५ x १२ सें.मी. बियाणे प्रमाण:१० किलो प्रती हेक्टर.<br>➢ पेरणीसाठी सुधारित वाण: फुले अनुराधा, फुले चित्रा, फुले सुचित्रा, फुले वसुधा आणि फुले रेवती. |

**अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन**

**ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर**

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| **मूग** | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ मुगाच्या शेंगा ७५% वाळल्यानंतर पहिली तोडणी करावी व त्यानंतर ८ ते १० दिवसांनी राहिलेल्या सर्व शेंगा तोडाव्यात.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेती मालाची कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. शेती मालाची साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये. |
| **राजमा** | पक्वता | ➢ पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेती मालाची कोरडया व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **भुईमुग** | शेंगा भरणे | ➢ भुईमुग पिकावर काही ठिकाणी हुमणी किडीचा प्रादुर्भाव दिसून आलेला आहे नियंत्रणासाठी मेटारायझियम @ ५ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणात मिसळून आळवणी करावी. |
| **आले** | वाढीची | ➢ पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी पिकावर ५ % निंबोळी अर्काची किंवा कार्बारील ४० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी याप्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| **कांदा** | लागवड (रांगडा) | ➢ पावसाची उघडीप पाहून रांगडा कांद्याची लागवड करावी त्यासाठी बसवंत ७८०, फुले समर्थ, एन -२-४-१ या जातींचा वापर करावा. लागवडीचे अंतर:१५x१० सें.मी. बीजप्रक्रिया : अझोस्पीरीलम व स्फुरद विरघळविणारे जीवाणू २५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास चोळावे. |
| **डाळिंब** | फळ वाढ | ➢ फळ वाढीच्या अवस्थेत तेलकट डाग व्यवस्थापनासाठी जर फळावर १० ते २५% पर्यंत प्रादुर्भाव दिसून आल्यास आणीबाणीच्या वेळी ४ दिवसांच्या अंतराने २ फवारण्या घेण्यात याव्यात.<br>➢ पहिली फवारणी: कॉपर हायड्रॉक्साइड ५३.८ % @ २ ग्रॅम प्रती लिटर + स्ट्रेप्टोसायक्लीन १००% @ ०.५ ग्रॅम प्रती लिटर + ब्रोनोपॉल ९५ - ९८% @ ०.५ ग्रॅम प्रती लिटर + स्प्रेडर स्टिकर @ ०.५ मिली प्रती लिटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी नंतर पुढील चार दिवस कोणतीही फवारणी करू नये व पाचव्या दिवशी दुसरी फवारणी करावी.<br>➢ दुसरी फवारणी: कार्बेन्डॅझिम ५०% डब्ल्यू. पी. @ १ ग्रॅम प्रती लिटर + स्ट्रेप्टोसायक्लीन १००% @ ०.५ ग्रॅम प्रती लिटर + ब्रोनोपॉल ९५ - ९८% @ ०.५ ग्रॅम प्रती लिटर + स्प्रेडर स्टिकर @ ०.५ मिली प्रती लिटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी. |
| **ऊस** | वाढीची | ➢ सहा ते आठ आठवडे वयाच्या आडसाली लागणीस को.८६०३२ जातीसाठी शिफारशीत (५००:२००:२०० किलो नत्र, स्फुरद व पालाश) खत मात्रेच्या ४० टक्के नत्र खताची दुसरी मात्रा द्यावी यासाठी २०० किलो नत्र (४३४ किलो युरिया) व इतर जातींसाठी शिफारशीत (४००:१७०:१७० किलो नत्र, स्फुरद व पालाश) नत्र खत मात्रेच्या ४० टक्के नत्र खताची दुसरी मात्रा द्यावी यासाठी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया) प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावे. खत मात्रा देताना ६ किलो युरियासाठी १ किलो निंबोळी पेंडीची भुकटी चोळून द्यावी. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ सातारा जिल्ह्यामध्ये पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>➢ सर्व निरोगी जनावरांना लाळ खुरकत रोगाची प्रतिबंधक लस सप्टेंबर महिन्यामध्ये टोचून घ्यावी. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. : १७.०९.२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**